प्रेस प्रकाशन PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग**, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
**Department of Communication**, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022-22660502

ऑगस्ट 5, 2019

**दि ओझर मर्चंट्स को-ऑपरेटिव बँक लि. ओझर, जिल्हा नाशिक, महाराष्ट्र ह्यांचेवर दंड लागु**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46 (4) सह वाचित कलम 47 अ (1)(क) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व्ह बँकेने**, दि ओझर मर्चंट्स को-ऑपरेटिव बँक लि. ओझर, जिल्हा नाशिक, महाराष्ट्र** ह्यांचेवर रु.4.00 लाख (रुपये चार लाख) दंड लागु केला असून, तो दंड, संचालक संबंधित अग्रिम राशी व नागरी सहकारी बँकांद्वारे डिव्हिडंड घोषित करणे ह्यावर भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेले निर्देश/सूचना/मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन केले गेल्याने लावण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती व त्यावर वरील बँकेने तिचे लेखी उत्तर सादर केले होते. ह्या प्रकरणातील सत्य व वरील बँकेने दिलेले उत्तर विचारात घेऊन रिझर्व्ह बँकेने निष्कर्ष काढला की उल्लंघने झाल्याचे सिध्द होत असून त्यासाठी आर्थिक दंड लावणे आवश्यक आहे.

**योगेश दयाल**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन : 2019-2020/345**